# कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) व ई-नाम (e-NAM) : एक विश्लेषणात्मक अभ्यास

**डॉ. करमसिंग राजपूत**

अर्थशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी जि. यवतमाळ

**सारांश (Abstract)**

**कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC)**

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३ या कायद्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी वेळोवेळी बदल करण्यात आले. साधारणपणे १९८७, २००२, २००३, २००६ तसेच २०१७ साली बाजार समितीच्या मूळ कायद्यात बदल करून तो वेळोवेळी शेतकरी हिताचा कसा करता येईल यासंबंधी प्रयत्न करण्यात आले

**कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकार व कर्तव्ये:** बाजार समितीचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे

१. शेतमालाविषयी शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करणे

२. शेतमालाची उघड लिलाव पद्धतीने विक्री करणे

३. बाजार समितीच्या आवारात विक्रीसाठी आलेल्या शेतमालाचे अचूक वजनमाप करणे

४. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमाल विक्रीचे २४ तासांत पैसे मिळवून देणे

५. बाजार समितीच्या आवारात शेतकरी व व्यापारी किंवा दलाल यांच्यात काही विवाद निर्माण झाल्यास अशा विवादाची तातडीने विनामूल्य तडजोड करणे

०६. अडते, व्यापारी, हमाल, मापारी, मदतनीस इत्यादींना परवाने (लायसन्स) देणे, परवान्यांचे नूतनीकरण करणे, परवाने रद्द करणे इत्यादी कार्ये करणे

०७. बाजार समितीच्या आवारात शेतमाल साठवणुकीची व्यवस्था करणे

**कृषी उत्पन्न बाजार समितीचे फायदे**

१. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचा शेतमाल बोली लावून विकला जातो.

२. कृषी उत्पन्न बाजार समितीत केवळ परवानाधारक (Licence Holder) व्यापारीच शेतकऱ्यांच्या शेतमालाची खरेदी करू शकतात.

३. कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना झाल्यामुळे शेतकरी बाजार समितीत आपल्या शेतमालाची योग्य किमतीला विक्री करू लागले.

४. बाजार समितीत शेतकऱ्यांच्या शेतमालाचे अचूक वजनमाप होत असल्यामुळे तसेच शेतमाल खरेदी - विक्रीचा व्यवहार पारदर्शक होत असल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक न होता त्यांना आपल्या मालाची योग्य किंमत प्राप्त होते.

**ई - नाम (इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार)**

इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार अर्थात e-NAM पोर्टलचे उद्घाटन दि. १४ एप्रिल २०१६ रोजी मा.पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. **"एक राष्ट्र एक बाजार" (One Nation One Market)** असा कृषी मालाच्या विक्रीसाठी एकच सामायिक मंच असावा या उद्देशाने e-NAM ची स्थापना करण्यात आलेली आहे.

**ई-नामचे फायदे**

१. ई-नाममुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीसाठी अनेक पर्याय उपलब्ध होतात.

२. स्थानिक व्यापाऱ्यांना e-NAM मुळे शेतमाल विक्रीसाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध होते.

३. ई-नाममुळे घाऊक व्यापारी, प्रक्रियादार, निर्यातक इत्यादींना स्थानिक बाजारात प्रत्यक्ष सहभागी होता येत असल्यामुळे त्यांना अडते, दलाल अशा मध्यस्थांवर होणारा खर्च करावा लागत नाही.

**मुख्य पारिभाषिक शब्द (Keywords):**१.कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC), २.ई-नाम (e-NAM)

**प्रस्तावना:** १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून स्वतंत्र झाला. ब्रिटिशांचे परकीय राज्य संपुष्टात येऊन भारताचे स्वतंत्र राज्य निर्माण झाले. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही देशात मोठ्या प्रमाणावर सावकारी व्यवसाय सुरूच होता. सावकार शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यावर भरमसाठ व्याज आकारीत असत. कर्जाची वसुली करताना सावकार कवडीमोल भावाने शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करीत असत. एकदा अशिक्षित शेतकऱ्याने सावकाराकडून व्याजाने कर्ज घेतले की, त्या कर्जाची परतफेड सावकाराच्या घशात स्वतःची जमीन टाकल्याशिवाय त्याला करता येत नसे. कर्जावरील भरमसाठ व्याजाच्या माध्यमातून तसेच कर्जाऊ रकमेच्याबद्दल कवडीमोल भावाने शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करून सावकार शेतकऱ्यांचे प्रचंड शोषण करीत असे. या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी व शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी तत्कालीन भारत सरकारने सन १९६४ मध्ये **कृषी उत्पन्न बाजार समित्या** स्थापन करण्यासंबंधी कायदा पारित केला. या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सन १९६७ पासून सुरू झाली. काळानुसार या कायद्यात पुढे अनेक बदल करण्यात आले.

**महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन्यामागील पार्श्वभूमी:** स्वातंत्र्यपूर्वकाळात शेतकऱ्यांनी पिकविलेल्या शेतमालाची विक्री शेतकरी स्वतःच्या इच्छेप्रमाणे करू शकत नव्हता. बाजारातील दलाल, अडते, मोठे व्यापारी यांच्याकडून शेतकऱ्यांच्या शेतमालाची अवैध पद्धतीने विक्री होत होती. शेतमालाच्या वजनात शेतकऱ्यांची सर्रास फसवणूक केली जात असे. तसेच मंदिराचे बांधकाम, पुलाचे बांधकाम, रस्त्याचे बांधकाम, धार्मिक कार्यक्रम इत्यादींसाठी शेतमालाच्या किमतीतून शेतकऱ्यांकडून वर्गणी स्वरूपात बरीच रक्कम कापून घेतली जात असे व शेतकऱ्यांचे जागोजागी शोषण केले जात असे. यातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात इ.स. १९२८ मध्ये ब्रिटिश सरकारने **रॉयल कमिशन** नावाचा एक अभ्यास गट नेमला होता. रॉयल कमिशनने आपल्या अहवालात शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनाला विविध शिफारशी केल्या. या शिफारशींच्या आधारे तत्कालीन केंद्र सरकारने प्रांतिक सरकारांना शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी कायदे करण्याबाबत निर्देश दिले. त्यानुसार मुंबई प्रांतात **'मुंबई कृषी उत्पन्न खरेदी व विक्री अधिनियम १९३९'** अस्तित्वात आला. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तसेच महाराष्ट्र राज्याची स्थापना केल्यानंतर सन १९३९ च्या कायद्यात योग्य ते बदल करून महाराष्ट्रासाठी **'महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी -विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३'** अर्थात बाजार समिती कायदा १९६३ हा कायदा पारित करण्यात आला. त्यानुसार महाराष्ट्रात कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना करण्यात आली. असे असले तरी महाराष्ट्रात काही ठिकाणी ब्रिटिश काळापासूनच कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना करण्यात आलेली दिसून येते. उदा. कारंजा लाड (जि. वाशिम) येथे इ.स. १८८६ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना करण्यात आली होती. ही भारतातील पहिली कृषी उत्पन्न बाजार समिती होय. तसेच वणी (जि. यवतमाळ) येथे सुद्धा स्वातंत्र्यापूर्वीच म्हणजे १ नोव्हेंबर १९१६ रोजी **'वणी कृषी उत्पन्न बाजार समितीची'** स्थापना करण्यात आलेली आहे. ही बाजार समिती राज्यातील एक अग्रगण्य बाजार समिती म्हणून ओळखली जाते.

महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३ या कायद्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी वेळोवेळी बदल करण्यात आले. साधारणपणे १९८७, २००२, २००३, २००६ तसेच २०१७ साली बाजार समितीच्या मूळ कायद्यात बदल करून तो वेळोवेळी शेतकरी हिताचा कसा करता येईल यासंबंधी प्रयत्न करण्यात आले. या बदलांमध्ये

साधारणपणे मॉडेल ॲक्ट, खाजगी बाजार समिती स्थापन करण्यास परवानगी देणे, करार शेती, व्यापाऱ्यांना बाजार समितीत न जाता स्वतःचे खरेदी केंद्र जाहीर करून शेतमालाची थेट खरेदी करण्यास दिलेली परवानगी तसेच शेतकऱ्यांमधून थेट बाजार समितीचे संचालक निवडून पाठविणे इत्यादी बदलांचा समावेश होतो.

**कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्यवस्थापन:** महाराष्ट्र कृषी उत्पन्न विपणन (विकास व नियमन) अधिनियम १९६३ व १९६७ मधील तरतुदीनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीत निवडून आलेले संचालक, त्यांच्यातील सभापती, उपसभापती, विविध उपसमित्या व बाजार समितीचा सचिव (मुख्य कार्यकारी अधिकारी) कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्यवस्थापन (कारभार) पाहतात.

**कृषी उत्पन्न बाजार समिती व्यवस्थापन मंडळाची रचना:** महाराष्ट्र कृषी उत्पन्न विपणन अधिनियम १९६३ नुसार कृषी उत्पन्न बाजार समितीवर एकूण २० संचालक निवडून जात असे. त्यात गाव पातळीवरील विविध कार्यकारी सोसायट्यांच्या शेतकरी सभासदांमधून ११ संचालक, बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत सदस्यांमधून ४ संचालक, अडते व व्यापारी मतदारसंघातून २ संचालक, हमाल व मापारी मतदारसंघातून १ संचालक असे एकूण १८ संचालक बाजार समितीवर निवडून जात असत. तसेच नगर परिषद क्षेत्र असल्यास नगर परिषदेचा प्रतिनिधी म्हणून १ नगरसेवक संचालक म्हणून तसेच पंचायत समिती सदस्यांमधून १ पंचायत समिती सदस्य संचालक म्हणून तर सहकार विभागातील सहाय्यक उपनिबंधक संचालक म्हणून नामनियुक्त केले जात होते. त्यामुळे बाजार समितीवरील निवडून गेलेले एकूण १८ संचालक व नामनियुक्त ३ असे एकूण १८+३ = २१ संचालक व पदसिद्ध सदस्य म्हणून बाजार समितीचे सचिव असे एकूण २२ सदस्यांचे व्यवस्थापन मंडळ निर्माण केले जात होते. सध्या (डिसेंबर २०२२) नगरपरिषद व पंचायत समितीतून पाठवण्यात येणारे प्रत्येकी १ संचालक वगळण्यात आल्यामुळे सध्या केवळ १८ संचालक बाजार समितीवर निवडून जाणारे तसेच सहकार विभागातून तालुका सहाय्यक उपनिबंधक आणि बाजार समितीचा सचिव असे एकूण २० सदस्यांचे संचालक मंडळ बाजार समितीचा कारभार पाहतात. तालुका सहाय्यक उपनिबंधक आणि बाजार समितीचा सचिव संचालक मंडळात सदस्य म्हणून कार्यरत असले तरी त्यांना मतदानाचा अधिकार नसतो. दि.१३ जून २०१७ मधील कृषी उत्पन्न बाजार समिती (APMC) कायद्यातील नवीन सुधारणेनुसार संचालक मंडळ निवडणुकीत बदल करून APMC च्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांमधून शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांमधून थेट निवडणुकीद्वारे निवडण्यात येणारे एकूण १५ संचालक, अडते व व्यापारी मतदारसंघातून २ संचालक तसेच हमाल व मापारी मतदारसंघातून १ संचालक असे एकूण १८ संचालक बाजार समितीवर निवडून पाठविण्यासंबंधी कायद्यात बदल करण्यात आला. परंतु दि.२४ जानेवारी २०२० च्या महाराष्ट्र शासनाच्या (महाविकास आघाडी सरकार/उद्धव ठाकरे सरकार) नवीन आदेशानुसार बाजार समितीच्या संचालक निवडणुकीसंबंधीची २०१७ ची सुधारणा रद्द करून पुन्हा पूर्वीच्याच पद्धतीने बाजार समितीची निवडणूक घेण्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे सध्या (डिसेंबर २०२२) १९६३ च्या बाजार समिती कायद्याप्रमाणेच बाजार समितीवर एकूण १८ संचालक निवडून जातात. वरील १८ संचालकांमधूनच सभापती व उपसभापती निवडले जातात व अन्य संचालक सदस्य म्हणून काम करतात. तसेच परवाना (लायसन्स) समिती, विवाद समिती, बांधकाम समिती, यात्रा समिती, सेवक समिती, उपबाजार समिती, नियमन समिती इत्यादी उपसमित्या सुद्धा असतात. विविध उपसमित्यांपैकी नियमन समितीमध्ये इतर सर्व उपसमित्यांचे अध्यक्ष हे सदस्य म्हणून काम करतात. बाजार समितीचे दैनंदिन कामकाज सुरळीत व्हावे म्हणून बाजार समितीच्या सचिवाला मदत करण्यासाठी अन्य कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाते. बाजार समितीच्या सचिवालाच मुख्य कार्यकारी अधिकारी असेही म्हटले जाते.

**महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांची संख्या**

सन २०१२ अखेर महाराष्ट्रात कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या अंतर्गत मुख्य बाजारांची एकूण संख्या ३०० तर उपबाजारांची एकूण संख्या ५९१ एवढी होती. महाराष्ट्रातील विभागवार कृषी उत्पन्न बाजार समितीत्यांची संख्या पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | विभाग | मुख्य बाजार | उपबाजार |
|---|---|---|---|
| १ | कोकण | २० | ३४ |
| २ | नाशिक | ५१ | ९४ |
| ३ | पुणे | ४४ | १२२ |
| ४ | औरंगाबाद | ३५ | ७२ |
| ५ | लातूर | ४९ | ९१ |
| ६ | अमरावती | ५५ | १०१ |
| ७ | नागपूर | ४६ | ७७ |
| एकूण | | ३०० | ५९१ |

स्रोत: महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

**महाराष्ट्रातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांची उत्पन्नावर आधारित वर्गवारी (वर्ष २०११-१२)**

| अ. क्र. | बाजार समिती वर्ग | बाजार समिती संख्या | उत्पन्न मर्यादा (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | अ वर्ग | १२० | १ कोटी रु. पेक्षा जास्त |
| २ | ब वर्ग | ९४ | ५० लाख रु.ते १ कोटी |
| ३ | क वर्ग | ४९ | २५ लाख ते ५० लाख |
| ४ | ड वर्ग | ३७ | २५ लाख रु. पेक्षा कमी |
| | **एकूण** | **३००** | |

स्रोत: महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

**कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकार व कर्तव्ये:** बाजार समितीचे अधिकार व कार्ये पुढीलप्रमाणे

१. बाजार समितीच्या आवारात शेतमाल खरेदी-विक्रीसाठी आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविणे

२. शेतमालाविषयी शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करणे

३. शेतमालाची उघड लिलाव पद्धतीने विक्री करणे

४. बाजार समितीच्या आवारात विक्रीसाठी आलेल्या शेतमालाचे अचूक वजनमाप करणे

५. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमाल विक्रीचे २४ तासांत पैसे मिळवून देणे

६. बाजार समितीच्या आवारात शेतकरी व व्यापारी किंवा दलाल यांच्यात काही विवाद निर्माण झाल्यास अशा विवादाची तातडीने विनामूल्य तडजोड करणे

७. बाजार समितीत येणाऱ्या लोकांच्या प्रवेशाचे आणि वाहनांच्या वाहतुकीचे नियमन करणे

८. बाजार समितीच्या आवारात व्यवसाय करण्यासाठी आलेल्या लोकांच्या वागणुकीवर देखरेख ठेवणे

९. शासनाने निश्चित केलेल्या किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी किमतीने शेतमालाची खरेदी-विक्री होणार नाही याची दक्षता घेणे

१०. शेतमालाची प्रत व दर्जा वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे

११. अडते, व्यापारी, हमाल, मापारी, मदतनीस इत्यादींना परवाने (लायसन्स) देणे, परवान्यांचे नूतनीकरण करणे, परवाने रद्द करणे इत्यादी कार्ये करणे
१२. विहित पद्धतीने बाजार समितीची निवडणूक घेण्यासाठी व्यवस्था करणे
१३. ज्यांच्या आधारे वजने व मापे यांची अचूक तपासणी करता येईल अशा प्रमाणीत वजने व मापे यांचा एक संच बाजार समितीत ठेवणे
१४. बाजार समितीच्या आवारात शेतमाल साठवणुकीची व्यवस्था करणे
१५ शासनाने निश्चित केलेल्या दराने बाजार समितीच्या क्षेत्रात खरेदी-विक्री होणाऱ्या शेतमालावर शुल्क (fees) आकारून ते गोळा करणे
१६. बाजार समिती कायदा व नियमातील तरतुदीनुसार परवानाधारक व्यापाऱ्यांच्या हिशेबाच्या नोंद वह्या व इतर अनुषंगिक कागदपत्रांची तपासणी करणे व हिशेब/ बिल पट्ट्या प्रमाणित करणे

**किमान आधारभूत किंमत म्हणजे काय? (MSP-Minimum Support Price):** किमान आधारभूत किंमत ही भारत सरकारतर्फे वेळोवेळी निश्चित करण्यात येत असलेली शेतमालाची किमान किंमत होय. या किमान आधारभूत किमतीनुसार सरकार शेतकऱ्यांकडून शेतमालाची खरेदी करीत असते. शेतमालाची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी सन १९६५ साली **कृषी खर्च व मूल्य आयोग** (Commission For Agriculture Costs and Prices-CACP) स्थापन करण्यात आला. हा आयोग दरवर्षी विविध शेतमालाच्या किमान आधारभूत किमतींबाबत केंद्र सरकारला शिफारस करतो. त्या शिफारशीनुसार केंद्रीय मंत्रिमंडळ विविध शेतमालाच्या किमान आधारभूत किमती जाहीर करते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत असणारा त्या-त्या शेतमालाचा भाव, मागील वर्षीचा त्या शेतमालाचा खरेदी भाव, त्या शेतमालाची मागणी व पुरवठा, त्या शेतमालाचे पेरणी क्षेत्र तसेच त्या शेतमालाचा सरासरी उत्पादन खर्च इत्यादी बाबी विचारात घेऊन कृषी खर्च व मूल्य आयोग शेतमालाची किमान आधारभूत किंमत निश्चित करीत असते.

भारत सरकारकडून सध्या (डिसेंबर २०२२ नुसार) एकूण २३ पिकांचे किमान हमीभाव जाहीर करण्यात येतात. ज्यात ७ प्रकारचे अन्नधान्य (धान, गहू, जऊ (बार्ली), ज्वारी, बाजरी, मका व नाचणी), ५ प्रकारच्या डाळी (चना, तूर, मूग, उडीद व मसूर), ७ प्रकारचे तेलवाण (भुईमूग, मोहरी, सोयाबीन, सूर्यफूल, तीळ, केशर बी व नायजर बी) व ४ प्रकारच्या नगदी पिकांचा (कापूस, ज्यूट, ऊस आणि सुके खोबरे) समावेश होतो.

**कृषी उत्पन्न बाजार समितीचे फायदे:** कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना झाल्यामुळे शेतकऱ्यांना खालील फायदे मिळतात.
१. कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचा शेतमाल बोली लावून विकला जातो. त्यामुळे जो व्यापारी जास्त बोली लावेल त्या व्यापाऱ्याला आपला शेतमाल विकण्याचे स्वातंत्र्य शेतकऱ्याला प्राप्त झाले आहे.
२. कृषी उत्पन्न बाजार समितीत केवळ परवानाधारक (Licence Holder) व्यापारीच शेतकऱ्यांच्या शेतमालाची खरेदी करू शकतात. त्यामुळे शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी केला आणि व्यापारी गायब झाला व शेतकऱ्यांचे पैसे बुडाले असे प्रकार बाजार समितीत होत नाहीत.
३. शेतकऱ्यांनी बाजार समितीत आणलेला शेतमाल व्यवस्थितपणे उतरविणे, त्याचे अचूक वजनमाप करणे, शेतकऱ्याला शेतमालाची योग्य किंमत मिळवून देणे इत्यादी बाबतीत अडत्यांची शेतकऱ्याला मदत होत असल्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होतो.
४. कृषी उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना झाल्यामुळे शेतकरी बाजार समितीत आपल्या शेतमालाची योग्य किमतीला विक्री करू लागले. त्यामुळे सावकारांच्या जाच्यातून त्यांची सुटका झाली.
५. बाजार समितीत शेतकऱ्यांच्या शेतमालाचे अचूक वजनमाप होत असल्यामुळे तसेच शेतमाल खरेदी - विक्रीचा व्यवहार पारदर्शक होत असल्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक न होता त्यांना आपल्या मालाची योग्य किंमत प्राप्त होते.

अशाप्रकारे शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजार समितीचे विविध फायदे प्राप्त होत असल्याचे दिसून येते.

**ई - नाम (इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार)**

(e-NAM : Electronic National Agriculture Market)

इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार अर्थात e-NAM पोर्टलचे उद्घाटन दि. १४ एप्रिल २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. **"एक राष्ट्र एक बाजार" (One Nation One Market)** असा कृषी मालाच्या विक्रीसाठी एकच सामायिक मंच असावा या उद्देशाने e-NAM ची स्थापना करण्यात आलेली आहे. ई - नाम (e-NAM) हे संपूर्ण भारतातील शेतकरी, व्यापारी, खरेदीदार यांना एकत्र आणणारे आणि सर्वोत्तम भाव व योग्य बाजारपेठ मिळवून देणारे एक ऑनलाइन पोर्टल होय. e-NAM या ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून शेतमालाची खरेदी-विक्री होताना कोणत्याही मध्यस्थाची किंवा कमिशन एजंटची आवश्यकता नसते. उत्पादक व ग्राहक यांच्यात थेट संबंध प्रस्थापित होत असल्यामुळे कमी खर्चात शेतकऱ्यांना आपला माल ग्राहकांपर्यंत पोहोचविता येतो. परिणामी शेतकऱ्यांना आपल्या मालाचे दोन पैसे जास्त मिळतात तर ग्राहकांना थेट शेतकऱ्यांकडून शेतमाल खरेदी करताना तो थोडा स्वस्त पडतो. त्यामुळे या व्यवहारात शेतकरी व ग्राहक दोघांचाही फायदा होतो.

**ई - नाम मार्फत शेतकऱ्यांनी शेतमाल विक्रीचे व्यवहार कसे करावे?**

शेतकऱ्याने enam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन तेथील सर्च बारमध्ये **'नोंदणी' (Registration)** या पर्यायाला क्लिक करावे. त्यानंतर **'शेतकरी' (Farmer)** हा पर्याय निवडून लॉग इन करावे. लॉग इन केल्याबरोबर संबंधित शेतकऱ्याला त्याच्या email ID वर तात्पुरता Login Id व पासवर्ड मिळतो. त्याच्या आधारे शेतकरी Login करू शकतो. कृषी उत्पन्न बाजार समितीकडून (APMC) मान्यता मिळाली की शेतकरी आपले व्यवहार करण्यास सुरुवात करू शकतो.

**ई - नामचे उद्देश :** ई - नामचे उद्देश पुढीलप्रमाणे.

१. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाची योग्य किंमत मिळवून देणे

२. शेतकरी व ग्राहक यांच्यातील मध्यस्थांचे उच्चाटन करणे

३. ग्राहकांना वाजवी किमतीत शेतमालाचा पुरवठा करणे

४. घाऊक व्यापाऱ्यांना शेतकऱ्यांकडून थेट शेतमाल खरेदीची व्यवस्था निर्माण करणे

५. स्थानिक शेतमालाला देशभरात पोहोचविणे

३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत २२ घटक राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेश मिळून एकूण १२०० कृषी उत्पन्न बाजार समित्या e- NAM शी जोडल्या गेलेल्या आहेत. तर सन २०१२ नुसार महाराष्ट्रात एकूण ३०० बाजार समित्या कार्यरत असून त्यापैकी११८ बाजार समित्या e - NAM शी जोडल्या गेलेल्या आहेत. e-NAM हे ऑनलाइन पोर्टल लहान शेतकरी कृषी व्यवसाय संघाने (SFAC - Small Farmers Agribusiness Consortium) अनुसरल्यामुळे तसेच त्याला बहुतांश घटक राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील पणनमंडळे, बाजारपेठांतील सचिव, देखरेख तज्ञ, दर्जा मानक तज्ञ, मापारी, सेवा पुरवठादार, शेतकरी, व्यापारी आदींनी स्वीकारल्यामुळे भारत सरकारच्या **'कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालया'** अंतर्गत येणारे e-NAM हे सर्वात मोठे पोर्टल बनले आहे. फेब्रुवारी २०२२ पर्यंत या पोर्टलवर १ कोटी ७२ लाख शेतकरी, २०५० शेतकरी उत्पादक कंपन्या, २,१३,००० व्यापारी तसेच सुमारे १ लाख कमिशन एजंट्सची नोंदणी झालेली आहे.

**e - NAM ची आवश्यकता का आहे?:** e - NAM च्या आवश्यकतेची कारणे पुढीलप्रमाणे.

१. वर्तमान परिस्थितीत देश अनेक कृषी बाजारांमध्ये विभागला गेला आहे. e-NAM मुळे संपूर्ण देशासाठी एकच कृषी बाजार निर्माण होईल. **"एक देश एक बाजार"** हा ई-नामचा प्रमुख उद्देश आहे.

२. परंपरागत कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील पायाभूत सुविधांचा दर्जा निम्न स्वरूपाचा असून अनेक बाजार समित्यांमध्ये शेतमाल विपणनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात नाही. e-NAM मध्ये शेतमाल विकण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे शक्य असल्यामुळे शेतकऱ्यांना ई-नाम बाजार फायदेशीर ठरेल.

३. परंपरागत कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतमाल विपणन प्रक्रियेत अनेक मध्यस्थ (व्यापारी, दलाल, अडते इत्यादी) असल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची अत्यंत कमी किंमत मिळते. e-NAM मध्ये अशा कोणत्याही मध्यस्थांची आवश्यकता नसल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या मालाची चांगली किंमत मिळेल.

४. सध्या कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत शेतमालाची विक्री करताना शेतकऱ्यांना विविध प्रकारचे कर, देणग्या, वर्गण्या द्याव्या लागतात. त्यामुळे प्रत्यक्षात त्याला आपल्या शेतमालाचे खूपच कमी पैसे मिळतात. e-NAM मध्ये व्यवहार करताना कोणत्याही प्रकारच्या देणग्या किंवा वर्गण्या द्याव्या लागत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाचे पुरेपूर पैसे मिळतात. e-NAM च्या माध्यमातून व्यवहार करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाचे पैसे e-payment द्वारे सरळ त्यांच्या खात्यात जमा होतात. e-payment च्या बाबतीत संपूर्ण देशात महाराष्ट्र सध्या (डिसेंबर २०२२) तिसऱ्या स्थानावर आहे.

**ई-नामचे फायदे**

१. ई-नाममुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीसाठी अनेक पर्याय उपलब्ध होतात.

२. ई-नाममुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाची ऑनलाईन विक्री होत असल्यामुळे बाजार समितीत शेतमाल नेण्याचा खर्च करावा लागत नाही.

३. स्थानिक व्यापाऱ्यांना e-NAM मुळे शेतमाल विक्रीसाठी मोठी बाजारपेठ उपलब्ध होते.

४. ई-नाममुळे घाऊक व्यापारी, प्रक्रियादार, निर्यातक इत्यादींना स्थानिक बाजारात प्रत्यक्ष सहभागी होता येत असल्यामुळे त्यांना अडते, दलाल अशा मध्यस्थांवर होणारा खर्च करावा लागत नाही.

५. ई-नामच्या माध्यमातून भविष्यात वैज्ञानिक पद्धतीने शेतमालाची साठवणूक व वाहतुकीला उत्तेजन मिळू शकते.

६. संपूर्ण देशातील बाजार समित्या जेव्हा ई-नामशी जोडल्या जातील तेव्हा व्यापाऱ्यांना परवाने देणे, शुल्क आकारणे तसेच शेतमाल इतरत्र नेण्याची प्रक्रिया इत्यादीबाबत संपूर्ण देशात सारखीच नियमावली अस्तित्वात येईल.

**संदर्भ सूची**

१. महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी –विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३

२.महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी–विक्री (विकास व नियमन) अधिनियम १९६३, सुधारणा -१९८७,२००२,२००३,२००६ व २०१७

३. महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे

४. दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. सकाळ इत्यादी वर्तमानपत्रे

५. ई-नाम पोर्टल, कृषी मंत्रालय, भारत सरकार

६. कृषी उत्पन्न बाजार समिती, वणी येथील बाजार समिती सचिवांकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे प्राप्त माहिती.